# कुठाय कायदा? कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र?

## नांदेड येथे पुन्हा संतापजनक घटनेने महाराष्ट्र हादरला!!

बीड ● सोमवार, दिनांक ८ डिसेंबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI: Regd.No.MAH/MAR/2010/43846

वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

यशस्वी २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# आंतरजातीय विवाह केला म्हणून पित्याने 7 महिन्यांच्या गरोदर मुलीला परळी येथील कला केंद्रामध्ये फक्त 2 लाखात विकले!!

- सक्षम आणि आंचलचे प्रकरण ताजे असतानाच पुन्हा नांदेडमधील या संतापजनक घटनेने उडविला थरकाप!!
- कला केंद्रात विक्री केली असली तरी माझ्या आई-वडिलांना माफ करा, असं म्हणण्याचं काळीज फक्त एका मुलीचेच असू शकते!!
- पीडित विवाहितेच्या विनंतीमुळे आई, वडिल यांच्यावर गुन्हा दाखल केला नाही : वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद घाडगे

## सुवर्ण मुलगी आणि दलित युवकांने आंतरजातीय विवाह केल्याने संतप्त मुलीच्या पित्याकडून कृत्य!!




**बीड : प्रतिनिधी**
**नांदेड येथील सक्षम आणि आंचल यांच्या प्रेमसंबंधांना आंचलच्या कुटुंबाने विरोध केला, कारण ते आंतरजातीय होते. यामुळे झालेल्या वादामध्ये आंचलच्या वडिलांनी आणि दोन भावांनी मिळून सक्षमची गोळ्या झाडून हत्या केल्याचे प्रकरण ताजे असतानाच नांदेड शहरातील एका सुवर्ण समाजातील मुलीने बौद्ध मुलाशी विवाह केला. ती सध्या सात महिन्यांची गरोदर होती. परंतु समाजामध्ये आपली बेइज्जत होईल म्हणून पीडित विवाहितेच्या घरच्यांनी तिला बीड जिल्ह्यातील परळी येथील कला केंद्रात फक्त दोन लाख पन्नास हजार रुपयांत विक्री केली. याची माहिती दि. 5 डिसेंबर 2025 रोजी बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद घाडगे यांना समजताच त्यांनी या पीडितेची कला केंद्रातून सुखरूप सुटका केली. पीडित विवाहितेने आई-वडिलांकडे जाण्यास स्पष्ट नकार देत पतीच्या घरी जाणे पसंत केले, त्यामुळे सदरील पीडित विवाहितेला पतीच्या स्वाधीन करण्यात आले, अशी माहिती वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद घाडगे यांनी दैनिक 'वास्तव'शी बोलताना दिली.**

### कला केंद्रात विक्री केली तरी घरच्यांना माफ करा म्हणण्याचं काळीज एका मुलीचेच असू शकते!

● आंतरजातीय विवाह करण्यासाठी अनेक तरुण-तरुणींना घरच्यांनी विरोध केल्यानंतर त्यांना घरचे लोक दुश्मन आहेत असेच वाटतात. परंतु, या नेहमीच येणाऱ्या कटू अनुभवाला छेद देण्याचे काम सदरील पीडित विवाहितेने केले आहे. या पिडीत विवाहितेने हे दाखवून दिले आहे की, एका मुलीचे आपल्याला जन्म दिलेल्या आई-वडिलांवर खरोखरच नितांत आणि निस्सीम प्रेम असते.

●आंतरजातीय विवाह केला म्हणून आपल्या घरच्यांनी आपल्याला एका कला केंद्रात फक्त काही रुपयांवर विक्री केले.

●याचा राग आणि प्रतिशोध घेण्याची तीळमात्र भावना पीडितेच्या चेहऱ्यावर नव्हती. म्हणूनच सदरील पीडितेने माझ्या आई-वडिलांवर कारवाईक करू नका, अशी हात जोडून विनंती तिची कला केंद्रातून सोडवणूक करणाऱ्या मिलिंद घाडगे यांच्याकडे केली. हे हृदय फक्त एका मुलीचेच असू शकते, अशा भावना व्यक्त होत आहेत.



परळी : बीड जिल्ह्यातील परळी येथील कला केंद्रातून पीडित विवाहितेची सुटका केल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा नेते मिलिंद घाडगे आणि त्यांचे सहकारी पीडितेबरोबर दिसत आहेत.

### जातीय अहंकारातून पोटच्या लेकराची विक्री करणे अत्यंत संताप जनक!



आपल्या भारत देशामध्ये स्त्रीला देवीचा दर्जा प्राप्त असताना सुद्धा जातीपातीच्या नावानं जातीय अहंकार डोक्यात ठेवून पोटच्या लेकराला अशा पद्धतीने विक्री करणे अत्यंत संताप जनक आहे. पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्राला हे अशोभनीय आहे. महाराष्ट्रात जे काही बुद्धिजीवी लोक आहेत यांनी खऱ्या अर्थाने समाज प्रबोधन करणे अत्यंत गरजेचे आहे. आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या सोशल मीडिया, प्रिंट मीडियाने सुद्धा लोकांचे प्रबोधन होईल अशा पद्धतीने काम करणे अत्यंत गरजेचे आहे. ➤ **मिलिंद घाडगे,** वंचित बहुजन आघाडी, महासचिव, जिल्हा बीड

### बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद घाडगे यांचे सर्व स्तरातून कौतुक

परळी येथील कला केंद्रामधून सदरील पीडित विवाहितेची सुटका करण्यासाठी बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद घाडगे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. विवाहितेला कला केंद्रातून सोडवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे नातेवाईकांची तक्रार असणे महत्वाचे आहे, असे पोलिसांचे म्हणणे होते. परंतु, नातेवाईकांची वाट न पाहता पिढीत विवाहितेच्या विनंतीमुळे मिलिंद घाडगे यांनी स्वत: तक्रारदार होत पोलिसांकडे अर्ज दाखल केला. मिलिंद घाडगे यांच्या तक्रारीवरून परळी येथील ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी मोलाचे सहकार्य करीत सदरील पीडित विवाहितेला परळी वैद्यनाथ येथिल कला केंद्रातून सुखरूप बाहेर काढले. मिलिंद घाडगे यांनी दाखवलेले या माणुसकीबद्दल त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

### पीडितीला म्हणाली, माझ्या घरच्यांना माफ करा, पण मला पतिकडेच राहायचे!!

मुलीने इच्छेविरुद्ध आंतरजातीय विवाह केल्यामुळे संतापलेल्या पीडित विवाहितेच्या घरच्यांनी पीडिता सात महिन्यांची गरोदर असल्यामुळे तिचे बाळंतपण आम्हीच करणार, अशी बतावणी करून तिला घरी आणण्यात आले. त्यानंतर घरच्यांनी तिची बीड जिल्ह्यातील परळी येथील कला केंद्रात फक्त दोन लाख पन्नास हजार रुपयांमध्ये विक्री केली. पीडित विवाहितेने या संदर्भात तिच्या संपर्कात असलेल्या नातेवाईकांना याची माहिती दिली असता तिला सुखरूप या कला केंद्रातून बाहेर काढण्यात आले. जेव्हा तिच्या लक्षात आले की, या प्रकारामुळे आपल्या आई-वडिलांवर आता कायदेशीर कारवाई होणार म्हणून तिने माझ्या आई-वडिलांना माफ करा त्यांच्यावर कारवाई करू नका, अशी विनंती हृदय पिळवटून टाकणारी होती. दरम्यान यावेळी पीडित विवाहितेची आई उपस्थित होती. पीडित विवाहितेने तिच्या आईबरोबर घरी जाण्यास स्पष्ट नकार देत तिने पतीबरोबर जाणेच पसंत केले.

---


**मोठे बातमी दुर्दैवी** ➤ साक्री तालुक्यातील हृदयद्रावक घटना; गावात शोककळा

# कांदा भरताना ट्रॅक्टर विहिरीत कोसळला; दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू

**धुळे : उमाकांत अहिरराव**
साक्री तालुक्यातील गणेशपूर दिघावे रस्त्यालगत खळबळ उडवणारी दुर्दैवी घटना घडली आहे. माजी पोलीस पाटील प्रकाश दगा मराठे यांच्या शेतातील विहिरीजवळ कांद्याच्या चाहीतून ट्रॅक्टरमध्ये कांदा भरत असताना अचानक तोल गेल्याने ट्रॅक्टर थेट 60 ते 70 फूट खोल विहिरीत कोसळला. या दुर्घटनेत दोन चिमुकल्या मुलींचा जागीच मृत्यू झाला असून एक मुलगी थोडक्यात वाचली आहे.

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या चिमुकल्या म्हणजे खुशी दादू ढाकरे (वय 4) आणि ऋतिका समाधान गायकवाड (वय 4) या दोघींचा समावेश आहे. तिसरी मुलगी सुदैवाने वाचली असून तिला प्राथमिक उपचारासाठी हलविण्यात आले आहे. घटनेनंतर काही क्षणातच परिसरात एकच आक्रोश पसरला.

गणेशपूर, दिघावे, छाईल आणि प्रतापपूर गावांतील तरुण मोठ्या संख्येने घटनास्थळी धावून आले. पाण्याने भरलेल्या खोल विहिरीत उतरून त्यांनी बचावकार्य सुरू केले. दरम्यान साक्री पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी देखील तातडीने घटनास्थळी पोहोचून बचावकार्यात सहभागी झाले. विहिरीत प्रचंड प्रमाणात पाणी असल्यामुळे बचावकर्त्यांना मोठा अडथळा निर्माण झाला असून अत्यंत जोखमीचे आणि कसरतीचे काम करावे लागत आहे. गेल्या पाच ते सहा तासांपासून अखंडितपणे बचावकार्य सुरू आहे, मात्र रात्री उशिरापर्यंत दोन्ही मुलींचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले नव्हते.



या हृदयविदारक अपघातामुळे संपूर्ण साक्री तालुका दु:खात बुडाला आहे. गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर हळहळ आणि शोककळा पसरली असून मृत मुलींच्या परिवारांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. अधिकाऱ्यांनी अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू केली असून बचावकार्य सुरू आहे.

# संभाजीनगरात भाजपा फेल?

## हिवाळी अधिवेशनात सर्वसामान्यांचा प्रश्न 'गुंठेवारी'ला देवाभाऊ देणार बगल; सर्वसामान्यांत संताप!

**छत्रपती संभाजीनगरात मनपा निवडणुकीत भाजपाला 'धोबीपछाड' मिळण्याचे संकेत**

➤ नागपूर : प्रतिनिधीराज्यात सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नावर देवाभाऊंचे सरकार कायम बगल देत आले आहे. आताही गुंठेवारीच्या ज्वलंत प्रश्नावर देवाभाऊ बगल देण्याच्या तयारीत आहेत.

छत्रती संभाजीनगरात महानगर पालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मननानी कारभाला राजकीय नेते खतापणी घालत असून सामान्यांची घरे पाडली जात असताना देवाभाऊंचे सरकार उघड्या डोळ्याने पहात होते. सर्वसामान्य



जनतेला ज्यादा रेडीरेकनर दरामुळे जास्तीचे गुंठेवारी चलन भरावे लागत आहे. पूर्वी ज्यांना ३० हजार रुपये गुंठेवारी चलन आले असेल तर आता तशाच घरांना लाखांच्या घरात गुंठेवारी चलन आले आहे. ३० हजार रुपये गुंठेवारी पूर्वी भरायची असेल तर चार हप्ते पाडून दिले जात होते आणि त्यामुळे सर्वसामान्य जनता छोटे छोटे हप्ते सहज भरू शकत होते आता वाढीव रेडीरेकनर दरामुळे गुंठेवारीचे दर वाढले आहे त्यामुळे सामान्यांना जवळपास दीड ते दोन लाखांची गुंठेवारी भरून मनपाची झोळी भरावी लागत आहे. गुंठेवारी करण्यासाठी इंजिनिअरचा दरही पुर्वी हजार रुपये होता तो आता पंधरा ते वीस हजार रुपये झाला आहे. मनपा कडे इंजिनिअरची टीम असताना एवढ्या मोठ्या दराने नागरिकांना घराचे नकाशे तयार करावे लागत आहे.

गरीब जनतेला एकदम एवढी गुंठेवारी भरणे केवळ अशक्य असून त्यात पैसे कमी करून हप्ते पाडून गुंठेवारी भरण्याची ● पान ३ वर...

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल . तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल . काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते . जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल . तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल . राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो . जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात .

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल . तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका . तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल . सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे . तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल . कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल .

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे . तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते . तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता . मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल . तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील . तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील . आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल .सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे .

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे . तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील . कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील . आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता . कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो . तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल . कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल .

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल . पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे . व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो . तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल . आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते . मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील .

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल . मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल . परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते . तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल . आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल . नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील . वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल .

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल . तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल . कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो . तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते . खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल . कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल . एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो .

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल . व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल . एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका,अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते . पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो . आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते . विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल . विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते . ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल .

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल . तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल . अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे . जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता . जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल . कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल . एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो . खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते . मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील .

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो . तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल . कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते . आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका . आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते . मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील .

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे . व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल . जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते . जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते . विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते . ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल . पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो .

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे . तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील . तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते . तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल . आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल . नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील . वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते .

# ...पण जेव्हा ही लक्ष्मणरेषा ओलांडली जाते तेव्हा

पालक या नात्याने आपल्या मुलाने मागितलेली प्रत्येक वस्तू घेऊन द्यावी असे प्रत्येक आई–वडिलांना वाटते . असे असले तरी लाड करणे, प्रेम करणे आणि अतिलाडाने बिघडवणेस यात अगदी अस्पष्ट अशी धूसर रेषा असते . पण जेव्हा ही लक्ष्मणरेषा ओलांडली जाते तेव्हा आपण हवे ते देण्याकडे, मागितले ते दिलेच पाहिजे असे वाटण्याकडे आणि मुलांना बिघडवण्याकडे घेऊन जाण्याचा धोका आहे . या गोष्टीकडे वेळेत लक्ष दिले नाही तर मोठेपणी या अशा लाडावलेल्या स्वभावाचा नातेसंबंधांवर, करिअरवर आणि एकूणच मुलांच्या वेलबीईंगवर मोठा परिणाम होतो .

यातील सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे पालकांचे असे वागणे त्यांच्या बऱ्याचदा लक्षात येत नाही . काही हेतू मनात ठेवून पालकांनी ते केलेले नसते . पण आपल्या लाडाने मूल बिघडू शकतं हे त्यांना माहितही नसते . ही लक्षणं पालक सहज मिस करतात आणि हळूहळू ती तुमच्या पालकत्वाची स्टाईल बनत जाते . पालकांच्या या ओव्हर प्रोटेक्टिव्ह वागण्याने, मागितलेली प्रत्येक गोष्ट मिळणं हा आपला अधिकारच आहे या विचाराने मग मुलांमध्ये शिस्तीचा अभाव दिसायला लागतो .

मानसशास्त्राने हा शोध घेतलाय की पालकांचे असे लाड करणे हे अखेरीस मुलांना हक्क देण्यासाठी आणि त्यातून बिघडवण्यासाठी कारणीभूत ठरते .

नेमकं यात घडतं तरी काय ? हे समजून घेताना तुम्ही ही चूक तर करत नाहीत ना ? हे पडताळून पहा .

१ ) अतिलाड करणारे पालक मुलांना आनंद मिळावा यासाठी स्वत :च्याही नकळत ओव्हर इनडल्ज होतात . हा या पालकत्वातील सगळ्यात मोठा तोटा आहे .

हे ‘ ओव्हर इनडल्ज ’ तीन प्रकारांनी होत असते .

१ ) अतिरेक

२ ) अतिरेकी पालन–पोषण : अतिलक्ष देणे, खूप काळजी घेणे, मुलाला खूप जास्त परावलंबी बनवणे .

३ ) पालकत्वाची हळूवार पद्धत : अगदीच सौम्य वागणे, खूप जास्त प्रतिसाद देणे .( high responsive ) अजिबात नियम नसणे किंवा नियमांचा बिलकुल आग्रह न धरणे .

१ ) मुलांना आनंदी पाहणे हा अशा प्रकारच्या पालकत्वाचा पाया असतो . असे असले तरी मुलांना खूश करण्याच्या नादात सगळं काही मुलाच्या मनासारखं करायचं ही पालकांची सवय बनू लागते . यातून कठोर परिश्रमाचे मूल्य आणि कष्ट केल्याने त्याचं चांगलं फळ मिळतं हे मुलं विसरायला लागतात . मग प्रत्येक गोष्ट प्रयत्न न करता मला सहजपणे मिळायला हवी अशी अपेक्षा मुलं करायला लागतात . यातून केवळ हे मिळणं हा माझा अधिकारच आहे इतकंच मुलांना वाटतं असं नाही, तर भविष्यात अपयश, निराशा आली, तर ते अशा परिस्थितीत जुळवून घेऊ शकत नाहीत .

२ ) स्वत : साठी मर्यादा ( boundaries ) घालून घेणं मुलांना जमत नाही .

कदाचित मुलांना हे अजून समजत नसेल पण प्रत्येक मुलाला काही ठराविक मर्यादा घालून देणे ही पालक म्हणून आपली जबाबदारी आहे . मुलांनी या मर्यादा समजावून आणि बाउन्ड्रीजबद्दल मनात आदर ठेवला, तर ते स्वत :वर नियंत्रण ठेवू शकतील आणि मग मुलं इतरांच्या भावना,

गरजा समजून घेऊ शकतील . जेव्हा पालक आपल्या मुलांबाबत बाउन्ड्रीज सेट करण्यात, मुलांना त्याला प्रतिसाद देण्याकरिता पाठपुरावा करत नाहीत तेव्हा मुलं संयम, मर्यादा ही संकल्पना समजू शकत नाहीत . आपल्याला जे करावंसं वाटतं ते करण्याचा आपल्याला अधिकारच आहे असे त्यांना वाटते . आपल्या वागण्याचा इतरांवर काय



परिणाम होईल याचा विचार ते करत नाहीत .

३ ) जी मुलं मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात अपयशी ठरतात ती मुलं मोठेपणी नेमून दिलेल्या मर्यादांचे पालन करण्यास असमर्थ ठरतात . ते नियम, मर्यादा यांचा आदर राखू शकत नाहीत . अशी मुलं शाळेतील वातावरणाशी जुळवून घेऊ शकत नाहीत किंवा जिथे काम करायचे आहे तिथेही मार्गदर्शक तत्त्वे पाळण्यास त्यांना कठीण जाते . यासाठीच सुस्पष्ट आणि सातत्यपूर्ण बाउन्ड्रीज मुलांना त्यांच्या वागण्याचे काय परिणाम होतील हे समजून घ्यायला मदत करतात . आणि ते इतरांबाबत अधिक सजग होऊन आदराने बोलतात, वागतात .

४ ) अतिलाड करणारे पालक आपल्या मुलांचा प्रत्येक प्रश्न स्वत :च सोडवतात . पालक या नात्याने प्रत्येक पालकाला असे वाटत असते की, आपण आपल्या पाल्याला ताण, असुविधा यापासून वाचवायचं असतं . हे खरं असलं तरी मुलांचा प्रत्येक प्रश्न सोडवण्यात पालकांनी घाईघाईने उडी घेणं हे मुलांच्या दृष्टीने उपयोगी न ठरता घातक होऊ शकतं . पालकांचं सतत या गोष्टीत हस्तक्षेप करणं यामुळे मुलाला असं वाटू शकतं की, आपण काही करायला केपेबल नाही . असा मेसेज जातो की त्यांच्यात स्वत :मध्ये समस्यांना तोंड देण्याची क्षमता नाही . मुलांचा आत्मविश्वास कमी होणे आणि अडचणी दूर करण्याबाबत ते दुसऱ्यावर अवलंबून राहतात . यात ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, खरं म्हणजे आपण थोडे लांब राहिलो, तर मुलांना असे प्रॉब्लेम्स सोडवण्याची संधी मिळते . समस्यांना कसे तोंड द्यायचे हे कौशल्यं आणि परिस्थितीनुसार स्वत :च्या स्वभावात लवचिकता कशी आणायची हेही ते शिकतात . येणाऱ्या अडचणी आणि चुकांमधून शिकणं हा भाग मुलांची वाढ आणि विकासातील सगळ्यात कठीण भाग आहे . म्हणून नेहमीच मुलांना अडचणी सोडवण्यासाठी पालकांनी स्वत : पुढे येण्याऐवजी छोटे छोटे प्रॉब्लेम्स सोडवण्याची संधी मुलांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली द्यायला हवी . अशाप्रकारे फक्त प्रश्न सोडवण्यात ते स्वावलंबी होत नाहीत, तर चुका या होतच असतात मात्र त्या चुकांमधून नवं शिकायला मिळतं हेही त्यांना कळते .

५ ) अतिलाड केले, तर मुलं कृतज्ञता व्यक्त करायला शिकणार नाहीत . मुलं ही स्पंजसारखी असतात . त्यांच्या अवतीभोवती जे घडतं ते सारं, अगदी ॲटिट्यूड आणि वागणं या साऱ्याच गोष्टी ते शोषून घेतात . आपण जर सतत मोठ्या गोष्टी कराव्या म्हणून मुलांच्या मागे लागायला सुरुवात केली, आणखी यश हवे, अधिक मार्क हवे असे म्हणत राहिलो, जे आहे त्यात कधी समाधानीच झालो नाही, तर आपली मुलंदेखील हेच शिकतील .

कारण पालकत्व हे आरशासारखे असते . हेच सततचं असमाधान घेऊन मुलं मोठी होतील . यातून आपल्याला सारखं काही तरी नवं, आपण जे मागू ते पालकांनी देणं हा आपला अधिकारच आहे असे त्यांना वाटायला लागेल . त्यांच्याजवळ जे आहे त्याचं त्यांना कौतुक राहणार नाही . याउलट त्यांच्या लहान लहान यशाबद्दल आपण त्यांची प्रशंसा केली, तर हे छोटे आनंद त्यांना स्वत :मधील गुणांची किंमत करायला शिकवतील . आपल्याजवळ जे चांगलं आहे त्याबद्दल आपण कृतज्ञ राहायला हवं हे जास्त महत्त्वाचे आहे नाही का ! मुलांना प्रत्येक वेळी शिकवायला हवे असे नाही, तर ते आपल्या कृतीतून, वागण्यातून दिसायला हवे . तुम्ही काय बोलता यापेक्षा तुम्ही काय करता याकडे मुलांचे लक्ष असते .

६ ) काही पालक मुलांच्या भावना ओळखायला आणि एम्पॅथी दाखवण्यात अपयशी ठरतात . पण जर पालक एम्पॅथॅटिक होऊ शकले, तर खूप फायदा होऊ शकेल कारण ‘ सहअनुभूती ’ हा एक प्रभावी ट्रेट ( प्रकार ) आहे . ज्यामुळे पालकांना मुलांशी कनेक्ट व्हायला खूप मोठी मदत होते . या एम्पॅथॅटिक होण्याने पालक मुलांच्या भावना समजून घेऊन स्वत :च्या भावना त्यांच्याशी शेअर करू शकतात . याच्यातून पालकांची मुलांशी मजबूत आणि निरोगी मैत्री होते . मुलांना एम्पॅथी नैसर्गिकरित्या येत नसते . त्यांना हे समजत नाही की, का मी माझी खेळणी इतरांबरोबर शेअर करायची ? माझ्या मित्राचा मूड खराब असेल तर मी का त्याला समजून घ्यायचं ? म्हणूनच पालकांनी मुलांना त्यांच्या भावना समजून घ्यायला, इतरांच्या भावना ओळखायला एम्पॅथॅटिक व्हायला शिकवायला हवे . मुलं जेव्हा नाराज असतात त्यांच्या भावना समजून त्यांना माया द्या . त्यांच्या आनंदातही सहभागी व्हा . मुलांना याची जाणीव द्या की, तुमच्या वागण्याचा, प्रतिक्रियेचा इतरांवर काय परिणाम होईल . समोरच्याच्या मनाला काय वाटेल .

७ ) अतिलाड करणारे पालक आपल्या मुलाला जणू सर्वोत्कृष्ट, हुशार आणि परफेक्ट समजतात जसं काही त्यांची मुलं म्हणजे सर्वोत्तम आहेत . त्यांचे पुतळे उभारायला हवेत . पालकांच्या अशा दृष्टिकोनामुळे मुलं स्वत :ला ‘ सुपिरिअर ’ समजतात आणि त्यांना वाटतं की जे आम्ही मागू ते आम्हाला मिळायलाच हवे . तो आमचा अधिकारच आहे . पालकांनी आपल्या मुलांचा, त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे यात काही चूक नाही . मुलं म्हणजे आपला अभिमान असतो, आनंदाचं निधान असतं . पण सतत त्यांना ‘ महान ’ बनवणे यातून नक्कीच प्रश्न निर्माण होतात . जेव्हा पालक मुलांना हे सांगत असतात की, तू सगळ्यात ‘ बेस्ट ‘ आहेस . स्मार्ट आहेस . सगळ्यात जास्त ‘ प्रतिभावान ’ आहेस . हे सतत ऐकल्याने मुलांच्या स्वत :बद्दल अवास्तव अपेक्षा तयार होतात . ते स्वत :ला सुपिरिअर समजायला लागतात .

८ ) अतिलाड करणारे पालक मुलांना त्यांनी केलेल्या चुकांपासून वाचवत असतात . आपल्या मुलांना त्यांनी केलेल्या चुकांचे परिणाम भोगताना पाहणे हे खरंच खूप कठीण असते विशेषत : जेव्हा हे परिणाम दु :ख देणारे किंवा निराश वाटायला लावणारे असतात तेव्हा पालकांना याचा खूप त्रास होतो . मुलांच्या मनावर ही गोष्ट बिंबवायला हवी की, त्यांना जे हवंय ते त्यांना सहजासहजी मिळणार नाही . यामुळे मुलांना एकमेकांविषयी आदर आणि आपल्याप्रमाणेच इतरांनाही मान्य करायचे असते या भावनेला प्रोत्साहन देतानाच, कोणी मदत केली असेल तर आपण कृतज्ञतेची भावना व्यक्त करायला हवी हे सारं मुलांमध्ये रुजवण्याची आपली जबाबदारी आहे .

दुसऱ्याला धन्यवाद म्हटल्याने त्या गोष्टी ग्राह्य धरणार नाहीत . अतिलाड केल्याने आपण नकळत मुलांना बिघडवत तर नाही आहोत ना ? याचे भान ठेवले तर मुलांना एक चांगला माणूस बनवण्याचे आपले स्वप्न आपण नक्कीच साकार करू शकू .

# भावनांशिवाय नातं अधुरं आहे

प्रत्येकाने भावनिक दृष्टीने सुरक्षित होणे कसे आणि का आवश्यक आहे, हे आपण या लेखातून पाहणार आहोत . खरं तर भावना म्हणजेच इमोशन्स हा मानस शास्त्रीय दृष्टिकोनातून खूप व्यापक विषय आहे . कारण आपल्या आयुष्याचा पूर्ण खेळच या भावनांवर आधारित असतो .

कोणाच्याही कोणाहीबद्दल असलेल्या चांगल्या भावना म्हणजेच प्रेम, गुंतवणूक, जिव्हाळा, आत्मीयता, माया, वात्सल्य, ओढ, काळजी, समर्पण अशा अनेक गोष्टींचं एकत्रिकरण असतं . प्रत्येक मानवी नात्यात आपल्याला यातील कोणती न कोणती भावना पाहायला मिळते . भावनांशिवाय नातं अधुरं आहे कारण आपण नातं हे एकतर मनाने, आवडीने, निवडीने जोडतो किंवा रक्ताने ते जोडलेलं असतं त्यामुळे तिथं फक्त डोक्याचा किंवा बुद्धीचा, प्रॅक्टिकल वापर केलेला नसतो . प्रत्येक नात्याचा पाया हा भावना असतातच आणि भावनांच्या या खेळामुळेच आपण खूपदा अडकतो, फसतो, रडतो, स्वत :ला खूप त्रास करून घेतो .

कुटुंबातील, समाजातील कोणीही दोन व्यक्ती असोत पती–पत्नी, आई–मुलं, बहीण–भाऊ, मित्र–मैत्रिणी, नातेवाईक या भावना जोपर्यंत दोन्ही बाजूने सारख्या प्रमाणात आहेत, त्यातील ओढ, प्रेम, नातं टिकवण्याची निभवण्याची इच्छा शक्ती सारखी आहे . त्या दोन्ही बाजूने समांतर सुरू आहेत तोपर्यंत त्या नात्याला अर्थ असतो . अनेकदा आपण बघतो खूप नाती ही एकतर्फी सुरू असतात . म्हणजेच दोघांमधील कोणीतरी एक व्यक्ती अशी असते जिचा स्वत :च्या



भावनांवर कंट्रोल नसतो, आवर नसतो, ती समोरील व्यक्तीशिवाय राहू शकत नसते, त्याच्या प्रेमात पार आंधळी झालेली असते, त्याच्यात खूप गुंतून गेलेली असते . आपल्याला वाटेल हे फक्त प्रेमप्रकरण अथवा प्रियकर–प्रेयसीच उदाहरण आहे पण तसं अजिबात नाही . अगदी पती–पत्नीच्या नात्यात, भाऊ–बहिणीमध्ये, दोन मित्रांमध्ये, मैत्रिणींमध्ये पण एकजण दुसऱ्याशिवाय स्वत :ला अपूर्ण समजतो, असुरक्षित समजतो . म्हणून वर्षानुवर्षे ते नातं त्याच्या बाजूने निभावतो . समोरची व्यक्ती लक्ष देवो न देवो, आपली दखल घेवो न घेवो, आपल्याशी कशीही वागो आपल्याला महत्त्व देवो अथवा न देवो . एकजण बिचारा तो आपला आहे, त्याच्याशिवाय आपल्याला कोण आहे, आपल्या सोबत तर तो आहे न्, आपल्याशी बोलत तर असतो न्, भेटत तर असतो न्, थोडाफार वेळ तर देतो न्, त्याचं नसलं तरी आपलं तर त्याच्यावर प्रेम आहे न्, आपल्या तर तो रक्ताचा आहे, नात्याचा आहे, जवळचा आहे, त्याला नसूदे जाणीव, मला आहे न् त्याची जाणीव या भाबड्या आशेवर आयुष्य काढत असतो . कधीतरी त्याला माझ्या भावना समजतील, माझी जाणीव त्याला होईल हा भाबडा समज ठेवून अनेक लोकं जगतात . अशा ठिकाणी आपली खूप मोठी फसगत होत असते . आपणच स्वत :ला, स्वत :च्या मनाला फसवत असतो कारण आपण फक्त मनाने, भावनेने विचार करताना डोकं, बुद्धी, विचार अजिबात वापरत नसतो . आपण आपल्या भावनांना मर्यादा घालू न शकल्यामुळे, कुठे थांबायचं ते आपल्याला न समजल्यामुळे, कोणासाठी किती करायचं ? स्वत :ला किती त्रास करून घेऊन करायचं याचा विचार करण्यासाठी आपण स्वत :ला वेळ देत नाही आणि समोरच्या मध्ये वाहवत जात असतो .

नातं हे दोन्ही बाजूंनी टिकवलं जाणं, बहरलं जाणं गरजेचे असते . अगदी भाऊ–बहिणीचं नातं असो वा दोन मित्रांचं नातं असो त्यात दोन्ही बाजूनी प्रेमाचं, आदराचं, त्यागाचं, समजूतदारपणाचं योगदान आवश्यक असतं . चूक नसतानाही नेहमीच एकजण माघार घेतोय कारण त्याचं प्रेम आहे तर ते योग्य नाही . कायम एकजण स्वत :हून बोलायला पुढाकार घेतोय तर ते अयोग्य आहे .

अनेक लोकांना वाटतं हा इगो आहे की गर्विष्ठपणा आहे ; परंतु याला आत्मसन्मान म्हणतात हे अनेकांना कळत नाही . वारंवार अपमान होऊन, वारंवार लाथाडले जाऊनपण आपण परत परत एखाद्याला शरण जात असू तर तिथे आपण स्वत :ला खूप स्वस्त करून घेत आहोत, आपली किंमत अशा ठिकाणी राहत नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे . बॅडमिंटनच्या खेळासारखं फूल खाली न पडू देण्याची जबाबदारी दोघांची असते तसंच नात्याचं असतं . या फुलासारखंच नातं जपण्यासाठी पण दोघांना कसरत करावी लागते . दोघांचा समतोल साधण्यासाठी कधी पळावं लागेल, कधी वाकावं लागेल, कधी मागे जावं लागेल, तर कधी पुढे यावं लागेल तरंच हे नातंरूपी फूल आपण अलगद हवेत झेलत राहू शकतो . दुर्दैवाने अनेक नातेसंबंधांमध्ये ही लवचिकता नसते . केवळ नातं आहे म्हणून अनेकांची आयुष्यभर फरफट होते . कधी दोघांची, तर कधी सगळ्यांचीच . हे सर्व टाळायचे असेल तर सर्वात महत्त्वाचे प्रत्येकाला आपल्या आवास्तव भावनांना आवर घालायला जमले पाहिजे . कुटुंबात, समाजात कुठेही वावरताना, वागताना थोडंफार का होईना पण लॉजिकने विचार करणे, प्रॅक्टिकल विचार करणे, खरं–खोटंमधील फरक समजणे, चांगलं–वाईट ओळखू येणे, माणसं ओळखू येणे, त्यांचे हेतू, उद्देश, स्वभाव समजणे खूप आवश्यक आहे . कोण काय बोलत आहे, का बोलत आहे त्याचा दहा बाजूनी अभ्यास आणि विचार करता येईल इतकं स्वत :ला प्रगल्भ बनवणे आवश्यक आहे . भावनांचा पाऊस तिथेच पाडावा जिथे त्याची किंमत आहे, त्याचा मान आहे जाण आहे . दुसरं कोणी काहीच करत नसतं . आपल्या भावनाच आपल्याला आयुष्यातून उठवू शकतात .

आपलं हळवं होणं, वाहवत जाणं, भावनावश होणं, चुकीचे निर्णय घेणं, समर्पित होणं, झोकून देणं, विचाराअभावी कृती करणं, व्यावहारिक वृत्तीचा विसर पडणं यामुळे आपण आपलं नुकसान करत असतो . आपण भावनेच्या आहारी जाऊन किती चुकीचे निर्णय घेतलेत हे आपल्याला भविष्यात समजते पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते . त्यामुळेच वेळोवेळी आपल्याला स्वत :च्या भावना तपासून त्या मर्यादेत ठेवणं जमलं पाहिजे . कोणी आपल्याला इमोशनल ब्लॅकमेल केलं, आपल्याला आपलं नुकसान होईल, असे काही निर्णय घ्यायला लावले अथवा कृत्य करायला लावले तर वेळीच सावध होणं जमलं पाहिजे . कोणत्याही नात्यातील कोणतीही भावना असो त्यामुळे जर आपण संपणार असू, आपलं अस्तित्व संपणार असेल, आपल्याला धोका होणार असेल, आपला गैरफायदा घेतला जाणार असेल तर वेळीच आपल्या भावना आवरा . ज्यांना फक्त गरजेपुरती, जे फक्त स्वार्थासाठी आपल्याला भावनिक करत आहेत अशा लोकांपासून सावध राहा . आपल्या भावनिक स्वभावाचा जे कामापुरता वापर करून घेतात, जे सतत रंग बदलतात अशा लोकांसाठी भावनांचा बाजार मांडणे मूर्खपणा होय . अशा टॉक्सिक नात्यामधून बाहेर यायचं ठरवा त्यासाठी सेल्फ लव्ह म्हणजेच स्वत :वर प्रेम करणे आणि स्वत :ची मानसिक स्तरावर काळजी घेणे आवश्यक आहे . कारण असे भावनांशी खेळणारे लोकं तुम्हाला मानसिक दृष्टीने पूर्ण उद्‌ध्वस्त करू शकतात .

सांज दैनिक बीड वास्तव
सायं . दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी . बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले . संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट , निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ ( या अंकामध्ये छापलेल्या मजकुराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो . 9022952922

# आता हॉटेलमालक, व्यापारी, आयोजक यांना ग्राहक आधार छायांकित प्रत स्टोअर करता येणार नाही- UIDAI कडून महत्वाचा निर्णय

मुंबई : ग्राहकांच्या सुरक्षेसाठी व पारदर्शकतेची निश्चिती करण्यासाठी आधार कार्ड नोंदणीत नवे मोठे बदल होणार आहेत. नव्या बदलानुसार आगामी दिवसात व्यापारी, हॉटेलमालक, कार्यक्रमाचे आयोजक यांनी घेतलेल्या आधार कार्डची छायाकिंत प्रत घेण्यापासून व आपल्या डिव्हाईस अथवा सिस्टिम मध्ये स्टोर करण्यापासून प्रतिबंध करण्यात येणार आहे. तसेच नवीन पडताळणीमुळे केंद्रीय आधार डेटाबेसशी कनेक्टेड असलेल्या मध्यवर्ती डेटाबेसवरचा ताणही कमी होऊ शकतो असे युडीआयडीएआय संस्थेने स्पष्ट केले आहे. थेट छायांकित प्रत स्मार्टफोनवर स्टोअर करणे हे आधार कार्ड कायद्याच्या चौकटीत बसत नाही. त्यामुळे या नियमात परिवर्तन करण्यासाठी आधार कार्ड नियमात बदल होऊ शकतात.

याशिवाय ऑफलाईन पडताळणी करण्याची इच्छा असलेल्या संस्थांना मध्ये प्रवेश मिळू शकेल. या माध्यमातून ते थेट आधार पडताळणीसाठी आपली सिस्टिम अपडेट करु शकणार आहेत. याविषयी बोलताना भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण चे सीईओ भुवनेश कुमार यांनी सांगितले आहे की, 'प्राधिकरणाने हॉटेल्स, कार्यक्रम आयोजक इत्यादी संस्थांना आधार-आधारित पडताळणी करणाऱ्या संस्थांची नोंदणी अनिवार्य करणारा एक नवीन नियम मंजूर केला आहे, जेणेकरुन त्यांना नवीन तंत्रज्ञानाची सुविधा मिळेल ज्यामुळे ते QR कोड स्कॅन करून किंवा नवीन आधार ॲपशी कनेक्ट करून एखाद्या व्यक्तीची पडताळणी करू शकतील, असे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

नवीन नियम प्राधिकरणाने मंजूर केला आहे आणि लवकरच तो अधिसूचित केला जाईल हॉटेल्स, कार्यक्रम आयोजकांसारख्या ऑफलाइन पडताळणी करणाऱ्या संस्थांची नोंदणी अनिवार्य करेल. कागदावर आधारित आधार पडताळणीला निरुत्साहित करणे हे उद्दिष्ट आहे' असे ते पुढे म्हणाले आहेत. उपलब्ध माहितीनुसार, युडीआयडीआय एका नवीन ॲपची बीटा-चाचणी करत आहे जे प्रत्येक पडताळणीसाठी केंद्रीय आधार डेटाबेस सर्व्हरशी कनेक्ट न होता ॲप-टू-ॲप पडताळणी सक्षम ठरणार आहे. नवीन ॲप विमानतळ, वयानुसार उत्पादने विकण्याची आवश्यकता असलेल्या दुकाने इत्यादी ठिकाणी देखील वापरता येईल.

# नवापूर वन विभागातील महाघोटाळ्याचा भडिमार! तीन अधिकारी मौनात; भ्रष्टांची लूट काही थांबेना!






**धुळे - उमाकांत अहिरराव**

नवापूर/नंदुरबार - गुजरात सीमेवरील नवापूर उपज तपासणी नाक्यावर सुरू असलेल्या अवैध वसुलीच्या महाघोटाळ्याचा दैनिक वास्तवने, भडिमार करत भंडाफोड केला. व्हिडिओ पुरावे, वाहनचालकांच्या साक्षी, 1600 रुपयांची थेट लूट आणि केवळ शासन फी 100 रुपये असल्याचे अधिकृत विधान सर्व काही बाहेर आले. पण तरीही, वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल काशीकर, DCF संतोष सस्ते आणि वन संरक्षक, श्रीमती. निन्नू सोमराज. हे तिघेही खोल मौनात! जणू काही घडलेच नाही अशा पद्धतीने मूक पुतळ्यासारखे थिजून बसलेले दिसत आहेत.

### स्टिंगनंतर तीन अधिकाऱ्यांचे मौन संशयास्पद – कोणाला वाचवले जात आहे?

स्टिंग ऑपरेशननंतर सर्व अधिकाऱ्यांना थेट संपर्क केले गेले. अमोल काशीकर फोनवर 'फी फक्त 100 रुपये' असल्याचे सांगितले, पण 1600 ची लूट चालूच. DCF संतोष सस्ते – फोन घेत नाही, मेसेजला उत्तर नाही. वन संरक्षक निन्नू सोमराज स्टिंगचे व्हिडिओ, पुरावे, माहिती सर्व पाठवूनही अद्याप कारवाई शून्य असल्याचीही चर्चा आहे.

नवापूर, धुळे व नंदुरबार विभागातील तीनही जबाबदार अधिकाऱ्यांचे हे मौन आता जनतेसाठी गंभीर संकेत देत आहे. मौन म्हणजे अनुज्ञा? मौन म्हणजे संरक्षण? की मौनाच्या आड मोठे मासे? या तिन्ही अधिकाऱ्यांचे एकसारखेच शांत बसणे, एकही ठोस पाऊल न उचलणे. हा योगायोग नसून संशयाचा गडद धुरळा निर्माण करणारा प्रकार आहे.

### वन संरक्षक, श्रीमती. निन्नू सोमराज, जवाबदार पदावर असूनही ठोस कारवाई नाही!

वन विभागातील जिल्हा पातळीवरील सर्वोच्च जबाबदारी वन संरक्षक (DFO) निन्नू सोमराज यांच्यावर येते. त्यांना :स्टिंग ऑपरेशनचे व्हिडिओ पाठवले, वाहनचालकांचे बाईट पाठवले, प्रत्यक्ष अवैध वसुलीचे पुरावे दिले, फोन करून माहिती दिली, पण तरीही एकही कारवाई नाही!

एकही नोटीस नाही! आणि एकही प्रतिक्रिया नाही! जनतेत आता सर्रास प्रश्न विचारला जात आहे. वन संरक्षकच जर शांत बसणार, तर मग भ्रष्टांना पाठबळ कोण देतंय? अधिकाऱ्यांचे मौन हेच भ्रष्टाचाराचे ढाल तर नाही?

## लुटीतील 'मोठे मासे' कोण आहेत? आणि अधिकारी त्यांना का वाचवत आहेत?

### वनरक्षक महिला आणि खाजगी पंटरचा दिवसाढवळ्या दरोडा!

स्टिंगमध्ये स्पष्ट दिसते, परराज्यातील वाहनांमधून 'पास चेंज'च्या नावाखाली थेट 1600 रुपये उकळले जात आहेत. मात्र शासन फी 100 रुपये असल्याचे वनपरिक्षेत्राधिकारी अमोल काशीकर यांनीच कबूल केले. मग उर्वरित 1500 रुपये जातात कुठे? कोणाच्या खिशात? कोणाच्या संरक्षणाखाली? हा सवाल आता अधिकांनी अधिकच गंभीर बनला आहे. स्टिंगचे पुरावे भक्कम, पण अधिकारी सुन्न, भ्रष्टांची लक्तरे वेशीला टांगण्याची वेळ दोन दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्र हा भ्रष्टाचार पाहत आहे. स्टिंग ऑपरेशनचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल आहेत. दैनिक वास्तवचे प्रतिनिधी उमाकांत अहिरराव यांनी उघड केलेले सत्य नाकारण्याची कोणाचीही हिंमत नाही. तरीही कारवाई नाही! असे का? कारण या भ्रष्ट व्यवहारांचा लाभ कोणाला जातो? या लुटीतील 'मोठे मासे' कोण आहेत? आणि अधिकारी त्यांना का वाचवत आहेत? हे प्रश्न राजरोस उभे ठाकले आहेत.

### निष्कर्ष : तीनही अधिकाऱ्यांचे मौन! या महाघोटाळ्याला 'अधिकृत' संरक्षण?

नवापूर वन विभागातील हा भ्रष्टाचार केवळ एका वनरक्षक महिला व पंटरपुरता मर्यादित नाही. यामध्ये अमोल काशीकर संतोष सस्ते, निन्नू सोमराज या तिन्ही अधिकाऱ्यांचा मौन संशयाला खतपाणी घालणारे आहे. जनतेचा थेट सवाल : भ्रष्टांना पाठबळ देणारे हेच अधिकारी आहेत का?

**भाग दोन**

### नाक्यावरची लूट अजून सुरू असून स्टिंगनंतरही कुठलाही बदल नाही!

दैनिकात बातमी प्रसिद्ध होऊन दोन दिवस झाले. लूट थांबेल असा जनतेचा समज होता. परंतु वस्तुस्थिती अजूनही तीच आहे. तपासणी नाक्यावर 1600 ची वसुली सुरूच! अधिकारी मात्र तोंडावर टेप लावून बसलेले.

## संभाजीनगरात जाणार भाजपा फेल?

● पान १ वरून... सूविधा करावी म्हणून सरकारला, मुख्यमंत्र्यांना अनेक मेल करून निवेदने देऊनही कामे होत नाहीत. त्यामुळे नागपुर अधिवेशनात मुख्यमंत्र्यांच्याच मनात सामान्यांची कामे करण्याची नसल्याने ती होणार नाहीत असे चिन्ह दिसत आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील सर्वसामान्यांच्या मागणीला पुन्हा एकदा पाणे पुसणार असल्याचे दिसत आहेत.

**नागपूरमध्ये सोमवारपासून हिवाळी अधिवेशन, कोणते मुद्दे गाजणार ?**

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये आज सोमवार ८ डिसेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. राज्यात २ डिसेंबर रोजी नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी पहिल्या टप्प्याचे मतदान झाले आहे. आता २० डिसेंबर रोजी नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी दुसऱ्या टप्प्याचे मतदान आहे. मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू आहे. या वातावरणातच जाहीर झालेल्या कार्यक्रमानुसार हे अधिवेशन जेमतेम आठवडाभर असेल. अधिवेशनाची सुरुवात सोमवार ८ डिसेंबर रोजी होईल.

यंदाच्या हिवाळी अधिवेशनात विरोधक सरकारला विविध मुद्यांवर घेरण्याच्या प्रयत्नात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगाने घातलेला घोळ, मुंढव्यातील बेकायदा जमीन खरेदीचा व्यवहार, कथित सिडको जमीन घोटाळा, डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण या मुद्यांवर विरोधक सरकारला घेरण्याच्या प्रयत्नात असतील. तर सरकार या प्रकरणांमध्ये स्वत :ची बाजू मांडेल तसेच महत्त्वाच्या विषयांवर विधिमंडळात सकारात्मक चर्चा व्हावी यासाठी प्रयत्न करेल. विरोधक अजित पवारांच्या राजीनाम्यासाठी आग्रह धरण्याची शक्यता आहे. या मुद्यावरुन कदाचित अधिवेशनाचा सर्वाधिक काळ खर्ची जाण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबरच्या मतदानाला जेमतेम ४८ तास उरले असताना निवडणुकीच्या वेळापत्रकात बदल केला. या मुद्यावर विधिमंडळात चर्चा होण्याची शक्यता आहे. मतदार यादी, मतदारसंघांचे वाटप या मुद्यांवरुन सभागृहात वातावरण तापण्याची शक्यता आहे. यंदा पहिल्यांदाच विधानसभेत आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षनेताच नसल्यामुळे विरोधकांचे नेतृत्व कोण करणार याविषयी उत्सुकता आहे. 'इंडिगो'च्या गोंधळामुळे किती नेते वेळेत पोहोचणार याविषयी संभ्रम आहे. चहापानावेळी किती नेते नागपूरमध्ये असतील हे अद्याप समजलेले नाही. पण मागील काही अधिवेशनांच्या वेळी घडलेल्या घटना बघता शासकीय चहापानावर विरोधक बहिष्कार घालण्याची शक्यता आहे.

राज्यात विरोधी पक्षनेता नसल्याने कोणालाही विरोधी पक्षनेत्याचा बंगला दिलेला नाही. नागपूरमध्ये विरोधकांची पत्रकार परिषद काँग्रेसच्या कार्यालयात होणार असल्याचे वृत्त आहे.

## मतमोजणी व एमपीएससी परीक्षा एकाच दिवशी असल्याने निकाल लांबला!



**➤ बीड : ॲड राहुलकुमार राका**

बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांच्या निवडणुका दि. 02 डिसेंबर 2025 रोजी पार पडल्या. या निवडणुकांची मतमोजणी 21 डिसेंबर 2025 रोजी होणार होती परंतु आता 29 डिसेंबर 2025 रोजी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकतेचे निर्देश दिले आहे. दिनांक 21 डिसेंबर 2025 रोजी याच दिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संयुक्त पूर्व परीक्षा गट ब (अराजपत्रित) होणार आहे त्यामुळे उमेदवारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. या परीक्षेद्वारे विविध पदांची भरती होणार आहे. यामध्ये हजारो उमेदवार सहभागी झाले आहेत. सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक अशा विविध पदांसाठी ही पूर्व परीक्षा होणार आहे. परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होईल की नाही, याकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे. कोरोनानंतर आयोगाची वेळापत्रक कोलमडले आहे. आता मतमोजणी आणि परीक्षा एकाच दिवशी आल्याने परीक्षा पुढे ढकलली जाईल का? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

विविध परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या उमेदवारांची चिंता वाढली आहे. दरम्यान आयोग आता काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बरकतपुर, रायगाव, लोहगाव रस्त्यावर सावरिया जिंजर ट्रेडिंग कंपनीचे थाटामाटात उद्घाटन

### अद्रकचे मशीन असल्याने 40 खेड्यातील शेतकऱ्यांना आता बाहेर जायचे काम नाही!






**➤ चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव**

कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी जवळ असलेल्या बरकतपूर रायगाव लोहगाव रस्त्यावर आज सकाळी साडेअकरा वाजता सावरिया सेठ जिंजर ट्रेडिंग कंपनीचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात झाले या ट्रेंडिंग कंपनीत शेतकऱ्यांसाठी आद्रक सुंठ मिरची व शेतातील विविध प्रकारच्या माळव्यांची ढोकमध्ये खरेदी या ठिकाणी होणार आहे पूर्वी शेतकऱ्यांचा उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश गुजरात मध्य प्रदेश या ठिकाणी माल जायचा.. पण आता कृष्णा शेठ घुले यांनी शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्याच्या बांधाऊन डायरेक अद्रक त्यांच्या ट्रेडिंग कंपनीत येणार व आद्रकीची प्रक्रिया अद्रक धुण्याची मशीन भव्य दिव्य याठिकाणी साकारले आहे व शेतकऱ्यांसाठी व्यापाऱ्यासाठी रात्री बे रात्री राहण्यासाठी त्यांनी सुसच्च अशी व्यवस्था सुद्धा केली आहे गाडी पार्किंग आधुनिक सेवेचे हे सावरिया जिंजर ट्रेंटिंग कंपनी कमी दिवसात नाव रूपाला येणार हे पण तितकेच खरे या उद्घाटन सोहळ्यासाठी जिल्ह्याभरातून सर्व शेतकरी मित्र मंडळ उपस्थित होते राज्यातील व्यापारी परराज्यातील व्यापारी सुद्धा या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित होते या ठिकाणी परिसरातील सर्वच राजकीय पुढारी या कार्यक्रमाला उपस्थित होते कृष्णा शेठ घुले यांच्यासह दत्तू पाटील घुले यांनी आलेल्या सर्वच शेतकऱ्यांचा पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळेस वाकी शिवेश्वर देवस्थानाचे उत्तराधिकारी ह भ प नामदेव महाराज उपस्थित होते व माझी जिल्हा परिषद सदस्य भरत राजपूत तर या कार्यक्रमासाठी उत्तर प्रदेश हुन झांसी येथून नितीन राय, आशिष राय यांची पण उपस्थिती होती...या कार्यक्रमासाठी प्रवीण भुंजग गणेश वानखेडे यांनी परिश्रम घेतले

यावेळेस या कार्यक्रमाचे पूजन वेदशास्त्र संपन्न स्वामी समर्थ मठाचे मठाधिपती गणेश महाराज जोशी यांनी मंत्र उच्चार पारंपारिक पद्धतीने करून कार्यक्रमाची सुंदर अध्यात्मिक गोडी निर्माण केली होती.

## महा जम्बो शब्दकोडे



**आडवी विधाने**

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

**उभी विधाने**

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

**महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर**



विशेष



# जिमखाना क्रिकेट क्लबचा सौरभ राठोड याची U19 बीड जिल्हा क्रिकेट संघात निवड



बीड : महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित केलेल्या राज्यस्तरीय U-19 क्रिकेट स्पर्धेत रायगड येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली या संघात जिमखाना क्रिकेट क्लबचा अत्यंत मेहनती व कष्टाळू अष्टपैलू खेळाडू सौरभ राठोड यांने बीड जिल्हा क्रिकेट असोशियन मार्फत घेण्यात आलेल्या सराव सामन्यामध्ये चमकदार कामगिरी करत बीड जिल्हा क्रिकेट संघात आपले स्थान निश्चित केले.

या निवडीबद्दल बीड जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर सचिव प्रा. डॉ. आमेर सलीम महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी (राज्यमंत्री दर्जा), अनिल दादा जगताप, अॅड. शेख शफीक भाऊ, अॅड. सुभाष भाऊ राऊत, दै. रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब, दै. दिव्य लोकप्रभा चे संपादक संतोष मानूरकर, अभिजीत भैय्या बरीदे, प्रा. सचिन भैय्या उबाळे, सलीम जहांगीर, अजिंक्य भैय्या चांदणे, निवड समिती सदस्य राजन साळवी, जिमखाना क्रिकेट क्लबचे अध्यक्ष रिजवान खान, जुबेर सिद्दिकी, प्रा. जावेद पाशा सर, महेश वाघमारे, मनोज जोगदंड, संतोष लारा वाघमारे, गोपाल गुरुखुदे, शेख आरीफ, शाहरुख पठाण अतिक कुरेशी, फैज देशमुख, जमीर खान, शहजाद बेग, सय्यद असीम, अतिष अंधारे, संतोष खरात, अक्षय नरवडे, वैभव पवार या सोबतच जिमखाना क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक निसार तांबोळी यांच्यासह सर्व मान्यवरांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

### तो सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करेल



● जिमखाना क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक निसार तांबोळी म्हणाले सौरभ राठोड हा अत्यंत हालाखीच्या परिस्थीतून आला आहे. संघर्ष करत आहे. आम्ही त्यावर खूप मेहनत घेत आहोत. आम्हाला त्याच्याकडून खूप अपेक्षा आहेत. मला वाटते आमच्या अपेक्षा तो नक्कीच पूर्ण करेल यात माझ्यामनात कसलीच शंका नाही.

**निसार तांबोळी**
जिमखाना क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक

# बंजारा एसटी. आरक्षणासाठी लक्षवेधी न मांडणाऱ्या आमदारांच्या घरावर थाळी- नंगारा आंदोलन

## बंजारा समाजाचे राज्य स्तरीय नेते बी एम पवार यांचा इशारा



**➤ वडवणी - प्रतिनिधी**
हैद्राबाद गॅझेट तात्काळ लागू करुन बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा. या न्याय मागणीसाठी राज्यातील बंजारा समाज बांधवांनी ५८ मोर्चे काढून आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. या कालखंडात अनेक आमदारांनी जाहिर पाठिंबा दिला होता. ज्या ज्या आमदारांनी पाठिंबा दिला होता त्यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडाव्यात अन्यथा त्यांच्या निवासस्थानी थाळी- नंगारा आंदोलन केले जाईल असा इशारा सेवालाल सेना संस्थापक/ अध्यक्ष तथा ओबीसी नेते बी एम पवार यांनी केली आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बंजारा समाज हा या देशातील मुळ निवासी आणि आदिवासी जमात आहे, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि अन्य राज्यात एसटी, एससी च्या सवलती मिळतात परंतु महाराष्ट्रात व्हीजेएनटी च्या सवलती दिल्या जातात. हा एक प्रकारचा अन्याय आहे.

मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानात असताना सदरील गॅझेट मध्ये बंजारा/ लमाण ही जमात आदिवासी म्हणून स्पष्ट उल्लेख केला गेला आहे. राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट तात्काळ लागू करावे या न्याय मागणीसाठी राज्यातील बंजारा समाज बांधवांनी राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयावर अति विराट मोर्चे काढले होते. बंजारा एस टी आरक्षणाची न्याय मागण्यासाठी समाजाच्या मदतीसाठी राज्यातील जवळपास पन्नास विधानसभा/विधानपरिषद सदस्य आणि सात खासदार महोदयांनी जाहीर पाठिंबा देऊन पाठिंब्याचे पत्र दिले होते. पुढील आठवड्यात हिवाळी अधिवेशन सुरू होणार असून या अधिवेशनात ज्या ज्या आमदारांनी जाहिर पाठिंबा दिला आहे त्यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडाव्यात अशी विनम्र विनंती करण्यात येत आहे. फक्त समाजाच्या समाधानासाठी जर पाठिंबा देणार असाल आणि अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडणार नसताल तर अशा लोकप्रतिनिधींनीच्या घरासमोर थाळी- नंगारा आंदोलन छेडण्याचा इशारा बी एम पवार यांनी दिला आहे.

## राजू नारायण वाडेकर यांचे निधन



**चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव**
कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथील रहिवासी असलेले राजु नारायण वाढेकर रा. चिंचोली (लिं.) ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर यांचे आज दि. 07/12/2025 वार- रविवार रोजी सकाळी 8 :30 वाजता दु :खद निधन झाले. तरी त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, पत्नी, भाऊ असा परिवार आहे.
राजू भाऊ वाडेकर हे मनमिळाऊ स्वभावाचे होते चिंचोली लिंबाजी पंचक्रोशीतील सर्वांचे ते खूप जवळचे लाडके मित्र होते प्रत्येकाशी हसतपणे वागणारे राजू भाऊ यांचे दु :खद निधन झाल्याने प्रत्येक जण हळहळ व्यक्त करीत होता.

# जय महेश साखर कारखान्याच्या काजळीने नागरिक त्रस्त ; नागरिक अक्षरशः हैराण!

## ➤ महिलांचा इशारा : तात्काळ बंदोबस्त करा नसता तीव्र आंदोलन करू!



**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
माजलगाव / प्रतिनिधी : माजलगाव शहर तसेच परिसरात जय महेश सहकारी साखर कारखान्याकडून येणाऱ्या काजळीने प्रदूषणाची तीव्र समस्या निर्माण झाली असून नागरिक अक्षरश : हैराण झाले आहेत. कारखान्याच्या ढसाळ नियोजना मुळे हवेत उडणारी काजळी मोठ्या प्रमाणावर शहरात पसरत असून घरांचे अंगण, भिंती, कापडापासून वाहनांपर्यंत सर्व काही काळ्या थराने माखत आहे.

काजळीमुळे नागरिकांच्या श्वसनसंस्थेवर विपरीत परिणाम होत असून "श्वास घेतानाच काळी धूळ शरीरात जात आहे, मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे," असे संतप्त नागरिकांनी सांगितले. अनेक घरांचे दरवाजे, खिडक्या, ओसरी दररोज काळी पडत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या वाढत्या प्रदूषणाविरोधात शहरातील महिला संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

"काजळीचा त्रास असह्य झाला आहे. तात्काळ उपाययोजना न केल्यास आम्ही जय महेश कारखान्यावर मोठ्या प्रमाणावर आंदोलन करणार," असा इशारा संतप्त गृहिणींनी दिला आहे.

नागरिकांचा प्रश्न आहे की कारखान्याकडे पर्यावरण नियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक यंत्रणा असूनही त्याचा काय उपयोग ? काजळीकडे प्रशासन व कारखाना व्यवस्थापन यांचे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

परिसरातील आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण सुरक्षेच्या दृष्टीने कारखान्याने तातडीने धुरकट काजळी नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे. तर परिसरातील ज्वारी कापूस ऊस आदी पिकावर ही काजळी साचत असल्याने पिकाच्या उत्पादन क्षमतेवर होत असल्याचे येथील शेतकरी नेते अशोकराव नरवडे यांचे म्हणणे आहे.

# महामंडलेश्वर श्री श्री १००८ प.पु.माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या सुमधुर वाणीत

## भव्य शिवमहापुराण कथेला सुरुवात





**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
माजलगाव येथील श्री सद्गुरु सत्संग गोसेवा समिती यांच्या वतीने कौशल्यादेवी बजाज मैदान (मंगलनाथ), बायपास रोड येथे भव्यदिव्य श्री शिवमहापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे. सुप्रसिद्ध शिवमहापुराण कथाकार महामंडलेश्वर श्री श्री १००८ प.पु. माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या सुमधुर वाणीमधून ही कथा दि. ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत दुपारी २ ते ५ या वेळेत संपन्न होणार आहे.

**शोभायात्रेसह शुभारंभ:**
● शिवमहापुराण कथेला भव्य शोभायात्रेने सुरुवात होणार असून,
● पुणे येथील ७५ सदस्यांचे ढोल-ताशा पथक, - कलशधारी महिला, रथ, आकर्षक झांकी ही प्रमुख आकर्षणे असणार आहेत.

**भव्य मंडप व उत्कृष्ट व्यवस्था:**
● कथास्थळी सुंदर व आकर्षक मंडप उभारण्यात आला असून
● अतिथींसाठी सोफे व गाद्यांची व्यवस्था,
● पत्रकार बांधवांसाठी विशेष व्यवस्था, सर्व भक्तांसाठी खुर्च्यांची व्यवस्था अशा सुविधा करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रभरातील माँ कनकेश्वरी देवी यांच्या भक्त परिवाराचा या कथेसाठी मोठा ओघ अपेक्षित असून, भाविकांच्या निवास, चहा-नाश्ता व भोजनाची समर्पक व्यवस्था आयोजकांनी केली आहे.

### भाविकांना आवाहन

● पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी शिवमहापुराण कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सद्गुरु सत्संग गोसेवा समितीतर्फे करण्यात आले आहे.

### मुख्य यजमान व आयोजन

● या शिवमहापुराण कथेचे मुख्य यजमान श्री जुगलकिशोरजी लड्डा (टाकरवण) असून, माजलगाव येथील संपूर्ण राजस्थानी समाज, शिवभक्त व गोसेवक यांनी या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले आहे. तसेच महाप्रसादाचे मुख्य यजमान राजेंद्र, पुरुषोत्तम, अशोक, गोविंद करवा (डासाळा) परिवार असणार आहेत.

## कै. रामराव मेंडके यांच्या गंगापूजन कार्यक्रमानिमित्त

# अनिल महाराज गायकवाड यांचे कीर्तन संपन्न





**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गणले गेले पैलवान रामराव श्यामराव मेंडके यांना सोमवार दि. २४ नोव्हेंबर रोजी देवाज्ञा झाली होती. यानिमित्त गंगापूजनाचा किर्तन कार्यक्रम रविवार दि. ७ रोजी कालिका देवी मंदिरात आळंदीचे अनिल महाराज गायकवाड यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महाराजांनी उपस्थितांना आध्यात्मिक ऊर्जेचाविलक्षण अनुभव मिळवून दिला.

रामराव शामराव मेंडके माजलगाव तालुक्यात मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. त्याचप्रमाणे समाजात त्यांची मोठी प्रतिष्ठा होती. संपूर्ण मराठवाड्यात नावाजलेले मल्ल त्यांनी त्यांच्या तालमीत तयार केले होते.

आयुष्याच्या ८० व्या वर्षी त्यांना देवाज्ञा झाली. वारकरी संप्रदायाचा मोठा पकडा त्यांच्या आयुष्यात त्यांच्यावर राहिला होता. तब्बल २२ वेळा त्यांनी पंढरीच्या वाऱ्याही केल्या. ८ मुलं ४ मुली आणि ३५ नातूचा आधारवड असणारा वटवृक्ष २४ नोव्हेंबर रोजी कोसळला. या दु :खट घटनेच्या निमित्ताने रविवार दि. ७ रोजी गंगा पूजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

यावेळी आळंदीचे अनिल महाराज गायकवाड यांनी उपस्थित राहून कीर्तन केले. गंगापूजनेच्या पवित्र सोहळ्यात अनिल महाराजांनी केलेल्या कीर्तनातून उपस्थित भक्तांना अध्यात्मिक ऊर्जेचा विलक्षण अनुभव मिळऊन दिला. सुखदु :ख मृत्यू मोक्ष यावर भाष्य केले.

ई पेपर वाचा
- सांज दैनिक बीड - वास्तव

# टोकी येथे आ. बंब यांच्या निधीतून स्मशानभूमीच्या कामाला प्रारंभ



**➤ गंगापूर** : तालुक्यातील वडगाव/टोकी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या टोकी येथे आ. प्रशांत बंब यांच्या स्थानिक विकास निधीतून आर.सी.सी. बांधकाम स्मशानभूमी मंजूर झाली होती त्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली यावेळी वडगाव टोकीचे सरपंच दत्ताभाऊ कानकाटे, उपसरपंच ज्ञानेश्वर भुसारे, संचालक सावळीराम थोरात, ग्रामविकास अधिकारी कैलास गायकवाड, सामाजिक कार्यकर्त मुक्ताराम वाकचौरे, विलास पिठले, सनी करपे, आंबेलोहळचे माजी सरपंच किसन गवळी, कैलास मोतकर, मनोहर गायकवाड, सुनील मोरे, ग्रामपंचायत कर्मचारी कमल शहा पठाण आदींसह टोकी, बर्गीपूर, इब्राहिमपूर गावकऱ्यांचीं उपस्थिती होती.

# सैन्या भरती झालेल्या ऊसतोड मजुराच्या मुलाचा राजेश राठोड यांनी केला सत्कार



**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
माजलगाव / प्रतिनिधी : लोनवळ सेवागड तांड्यातील ऊसतोड मजुराचा मुलगा भारतीय सैन्य दलात भरती झाल्याबद्दल त्याचा भाजपचे युवा कार्यकर्ते तथा उपळी जि.प.गटाचे धडाडीचे नेतृत्व राजेश राठोड यांनी सत्कार करून त्याचा सन्मान केला.

तेलगाव पासुन जवळच असलेल्या लोनवळ तांडा सेवागड येथील ऊसतोड मजुर नामदेव राठोड यांचा मुलगा अविनाश नामदेव राठोड याची नुकताच भारतीय सैन्य दलात निवड झाली. ही आनंदवार्ता भाजपचे उपळी जि.प.गटाचे धडाडीचे युवा कार्यकर्ते राजेश राठोड यांना समजताच राजेश राठोड यांनी अविनाश राठोड यांच्या घरी जाऊन त्याच्यासह त्याच्या आईवडील यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नामदेव राठोड व त्यांच्या पत्नी यांनी ऊसतोड मजुरी करून व काबाडकष्ट करून आपल्या मुलांना शिक्षित केले. आपल्या आपल्या सारखे ऊसतोड मजुर न राहता सैन्य दलात भरती होऊन, देशसेवा करावी. अशी त्यांची ईच्छा होती. ती अविनाश याने पुर्ण केल्याचे राजेश राठोड यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले. तसेच अविनाश याचे सारखे इतरही विद्यार्थ्यांनी इतर विविध क्षेत्रात नोकरी कराव्यात असे म्हटले. यावेळी विठ्ठल चव्हाण, माऊली राठोड आदिसह सेवागड तांड्यातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# शासकीय फळरोपवाटिकेत उत्तम प्रतीची फळझाडांची कलमे, रोपे विक्रीसाठी उपलब्ध - प्रियांका झणझणे





**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
येथील शासकीय फळरोप वाटीकेत उत्तम प्रतीची आणि खात्रीशीर सर्व फळझाडांची कलमे आणि रोपे विक्री साठी उपलब्ध असून ज्या शेतकऱ्यांना पाहिजे आहेत त्यांनी दिलेल्या वेळेत संपर्क साधावा असे आव्हान येथील कृषी अधिकारी कु प्रियांका झनझणे यांनी केले आहे खालील प्रकार ची उपलब्ध कलमे रोपे आहेत केशर आंबा, सरदार एल ४९ पेरू,
कागदी लिंबू, कालीपत्ती चिक्कु, स्थानिक सीताफळ, स्थानिक जांभूळ, स्थानिक चिंच आदींची रोपे कलमे मिळतील या रोपांची खास वैशिष्ट्ये :शासकीय मान्यताप्राप्त दर्जेदार रोपे, रोगमुक्त व निरोगी, स्थानिक हवामानाला अनुरूप, शासनमान्य परवडणारे दर, उच्च उत्पादनक्षम आणि टिकाऊ लागवडीसाठी उपयुक्त सदरील रोपे मिळण्याचे ठिकाण परभणी चौक, तेलगाव रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड- ४३११३१ आणि मोबाईल : नंबर पुढील प्रमाणे आहे. मो. ९४०३२४६३९०, ९७६५३८०१९८ या मोबाईल वर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संपर्क करावा असे आव्हान येथील कृषी अधिकारी प्रियांका झनझणे यांनी केले आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त तालखेड येथे भव्य रक्तदान शिबिर आणि एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न



**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
तालुक्यातील तालखेड येथील पंचशील बौद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर तसेच १ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स पंधरवडा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा उपक्रम माजलगाव आयसीटीसी व ग्रामीण विकास मंडळ, बनसारोळा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. कार्यक्रमांतर्गत जागृती सत्र आणि एचआयव्ही तपासणी करण्यात आली. आयसीटीसी समुपदेशक शेख शाबुद्दीन सर यांनी उपस्थितांना एचआयव्ही व एड्सविषयी माहिती देत रोगाबाबतचे गैरसमज दूर केले.

"कलंक आणि भेदभाव दूर करून एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना मान-सन्मानाची वागणूक द्यावी," असे आवाहन त्यांनी केले.

या भव्य रक्तदान शिबिरात ५० जणांनी रक्तदान केले तसेच एचआयव्ही तपासणीही करण्यात आली. कार्यक्रमाला गावचे सरपंच गुलाबभाऊ मोरे, ग्रामपंचायत सदस्य पंडित ओव्हाळ, राजाभाऊ जाधव, बीड रक्तपेढीची टीम, लिंक वर्कर दशरथ राऊत, पाटील सर, घुगे मॅडम तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या उपक्रमाचे आयोजन विशाल जाधव, भीमसैनिक आणि तालखेड ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आले. सामाजिक भान जपत घेतलेल्या या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.